**कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर**
(सामान्य प्रशासन विभाग)
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४०००१
**Email Id :- gadnmcnagpur@gmail.com**

पत्र क्र. :- साप्रवि/ वि.स.औ.मु/17/२०२३ दिनांक:- १८/०८/२०२३

**विधानमंडळ कामकाज/ कालमर्यादा /अति-तातडीचे**

प्रति,

मा. अधिक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,
महानगरपालिका नागपूर.

**कालमर्यादा**

विषय :- मा. मोहन मते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेला औचित्याचा मुद्दा.
संदर्भ :- औचिमु-१७२३/प्र.क्र.१६५/नवि-२६ दिनांक:- १८/०८/२०२३. कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन यांचे प्राप्त अन्वये.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभा सदस्य श्री.मोहन मते यांनी औचित्याच्या मुद्दा उपस्थित केलेला असुन सदर विषय हा आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे पाठविण्यात येत आहे, स्वयंस्पष्ट अहवाल, पुरक टिप्पणीसह ud२०.urban-mh@mah.gov.in / vidya.hampayya@nic शासनाच्या पाठवण्यात यावी, तसेच पाठवण्यात येणाऱ्या उत्तराची एक प्रत gadnmcnagpur@gmail.com या संकेतस्थळावर प्रत सुलभ माहितीसाठी या कार्यालयास पाठविण्याची विनंती आहे.

सहपत्र :- संदर्भिय पत्र

अधिक्षक
सामान्य प्रशासन विभाग
महानगरपालिका नागपूर

प्रतिलीपी :-

१) मा. उपायुक्त, साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.
२) मा. सहा. आयुक्त साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.

6:10 PM
18/8/23

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

नगर विकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**दुरध्वनी क्र.-२२७९४२०६** **Email ID :-** ud26.urban-mh@mah.gov.in

vidya.hampayya@nic.in

---

**क्रमांक :- औचिमु-१७२३/प्र.क्र.१६५/नवि-२६** **दिनांक :-१८/०८/२०२३**

तात्काळ

प्रति,

आयुक्त,
नागपूर महानगरपालिका,
नागपूर.

**विषय** :-दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी विधानसभेत मा.श्री.मोहन मते, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेला औचित्याचा मुद्दा.

संदर्भ :- कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई यांचे पत्र क्र.१३४६२/म.वि.स./फ, दिनांक १४ ऑगस्ट, २०२३.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा.श्री.मोहन मते, विधानसभा सदस्य यांनी दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी सभागृहात उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुसार आवश्यक त्या कागदपत्रांसह स्वयंस्पष्ट अहवाल PDF Format व Word File (Sakal Marathi) मध्ये तात्काळ ud26.urban-mh@mah.gov.in व vidya.hampayya@nic.in या Email-Id वर पाठविण्यात यावा, ही विनंती.

**आपला,**

**(अनिल र. काटकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**सोबत : वरीलप्रमाणे**

श्री. मोहन मते : अध्यक्ष महोदय, मी औचित्याच्या मुद्याद्वारे आपले लक्ष वेधू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, नागपूर शहरात जलमय होणारे ६६ ठिकाण हे नागपूर महानगरपालिकेने चिन्हांकित केलेले आहेत. खऱ्या अर्थाने मुसळधार पाऊस झाला तर अनेक ठिकाणी पूर येऊ शकतो. अनेक नदी-नाल्यांच्या काठी एकूण ८५ वस्त्या आहेत. या वस्त्या संवेदनशील म्हणून नोंदविण्यात आलेल्या आहेत. परंतु यांच्यासाठी कोणतीही उपाययोजना महापालिकेने केलेली नाही. दर वर्षी नागपूर महानगरपालिका जमा होणारे पाणी पंपाच्या सहाय्याने काढतात. शंकर नगर चौक, पडोळे चौक, मनिष नगर रेल्वे अंडर ब्रीज, नरेंद्र नगर अंडर ब्रीज इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी तुंबते. महानगरपालिकेने पाणी तुंबणाऱ्या ठिकाणी उपाययोजना केली तर येथे पाणी साचणार नाही. नदी-नाल्यांच्या काठावर असलेल्या ८५ वस्त्या पावसाळ्यात जलमय होऊ नयेत, याकरिता योग्य ती उपाययोजना तातडीने करण्यात यावी.

---*---

# नागपूर महानगर पालिका, नागपूर

## (आरोग्य विभाग)

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

क्रमांक : आ.वि./3396/आ.अ.(एम)/NUHM/LAQ/2023
दिनांक :- २९/११/२०२३

वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय
सिव्हील लाईन्स नागपूर-01
Email: nuhmnagpur2019@gmail.com

**प्रति,**
**मा. सहा. अधिक्षक**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**महानगरपालिका नागपूर.**

**विषय :- औचित्याचा मुद्दा क्र. ९**
**मा. विधानपरीषद सदस्य यांनी दि. २१/०७/२०२३ रोजी विधानपरीषद मध्ये उपस्थित केलेल्या औचित्याचा मुद्दा क्र. ९ बाबत कार्यवाही करण्यासंदर्भात**

**संदर्भ :-** १) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. राजस्व/मह.सहा./नैआ/ब४अ/कावि २९२/२०२३ दिनांक-२७/१०/२०२३
२) मा. कक्ष अधिकारी नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. विसताप्र-२०२३ प्रक्र. ७७७/नवि-१६ (ई-६८७७८६) दि. २७/१०/२०२३
३) मा.सहा. अधिक्षक, साप्रवि, मनपा नागपूर यांचे प्राप्त पत्र क्र. साप्रवि/वि.स. अता/१७/२०२३ दि. ०९/११/२०२३

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, विधानपरीषद औचित्याचा मुद्दा क्र. ९ मा. श्री. गोपिचंद पडळकर, वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या विषयाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | सुचना | उत्तर |
|---|---|---|
| १ | आज रोजी महाराष्ट्र मध्ये ४ लाख नोंदणीकृत फार्मासिस्ट आहेत, दरवर्षी कॉलेजेस ची संख्या वाढत आहे. राज्यात २२ नवीन फार्मसी कॉलेजेसना परवानगी मिळाली आहे. अनेक वर्षापासुन स्पर्धा परीक्षा करणाऱ्या विदयार्थ्यांची संख्या १.५ लाख आहे. पदविका फार्मसी(D-Pharm) हा कोर्स फार्मसी कायदा १९४८ अंतर्गत आहे व ड्रग अँड कॉस्मेटिक १९४० अंतर्गत नोंदणीकृत फार्मसिस्ट हा औषध बनविण्यापासुन विक्रि पर्यंत सक्षम असतो, म्हणुन नोंदणीकृत पदविका धारक विद्यार्थी हा शासकीय सेवेपासुन वंचित राहु नये यासाठी आपण ताबडतोब योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता, फार्मसी विद्यार्थी अनेक वर्षांपासुन स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. ड्रग इस्पेक्टर वर्ग २ पदासाठी शासनाने अनुभवाची अट काढुन टाकली आहे. मग गट क साठी लावणे उचित नसल्याची विद्यार्थ्यांची असणे, वैद्यकिय शिक्षण व औषध संचालनालय यांच्यामार्फत नुकतीच परीक्ष घेण्यात आली परंतु तिथे देखील कुठेही अशा अन्यायकारक अटी | नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत औषधनिर्माता या पदाकरीता D-Pharm (फार्मसी कौंसील कडील नोंदणी) हि शैक्षणिक अर्हता अनिवार्य आहे. शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार उच्च शैक्षणिक अर्हता धारकांना (B-Pharm & M-Pharm) अतिरिक्त गुण देण्यात येतात. तसेच खाजगी व शासकीय अनुभवाला अतिरिक्त गुण देण्यात येतात. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत |

| अ. क्र. | सुचना | उत्तर |
|---|---|---|
| | लावण्यात आलेल्या नाहीत, सार्वजनीक आरोग्य विभागात, जिल्हापरीषद, कुठेही अश्या प्रकारची अट लावण्यात आलेली नाही. मग महानगरपालिका मध्येच का यामध्ये गुणवंत विदयार्थी वंचित राहु शकतात त्यामुळे महानगरपालिकेसाठी निश्चित केलेली सेवा प्रवेश अट काढुन शुद्धीपत्रक काढण्याची मागणी मि विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे. | औषधनिर्माता या पदाकरीता अनुभव असणे अनिवार्य नाही. एखादया उमेदवाराला अनुभव नसला तरी तो उमेदवार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत औषधनिर्माता या पदाकरीता अर्ज करु शकतात. |

डॉ. नरेंद्र बहिरवार
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
म.न.पा. नागपूर

**प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादरः-**

१) मा. आयुक्त, म.न.पा. नागपूर
२) मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
३) मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापुर नवी मुंबई - ७००६१४

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-३२.

दूरध्वनी क्रमांक :- ०२२-२२७९४२०७ **Email ID :- ud20.urban-mh@mah.gov.in**

क्र. विपआ-२०२३/प्र.क्र.२६०/नवि-२० दिनांक:-१८ सप्टेंबर, २०२३.

विधानमंडळ कामकाज /कालमर्यादा /तातडीचे

प्रति,

आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.

विषय:- विधानपरिषद सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील विधानपरिषदेतील आश्वासन क्रमांक ३१७,
"महानगरपालिकेने शहरातील विशेष मुलांना आजारात दर्जात्मक सेवा मिळावी म्हणून खाजगी आरोग्य सेवे प्रमाणे परवडणाऱ्या दरात सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरु करण्याबाबत"".

महोदय,

मा. श्री. सचिन अहिर, विधानपरिषद सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने विधानपरिषदेत मा. मंत्री महोदय, श्री. उदय सामंत, यांनी दिलेल्या आश्वासन क्रमांक ३१७ पुढीलप्रमाणे आहे:-

" केवळ मुंबईतच नव्हे तर राज्यातील सर्व महानगरपालिकेत अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर असले पाहिजे व इतर महानगरपालिकेत असे सेंटर सुरु करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला जाईल व त्या बाबतच्या सुचना सर्व महानगरपालिका यांना देण्यात येतील."

०२. उपरोक्त आश्वासनासंबंधी इतिवृत्ताची प्रत व आश्वासनाची प्रत सोबत जोडली आहे. तरी सदर विधानसभा आश्वासनाच्या अनुषंगाने आपला स्वयंस्पष्ट अहवाल ई-मेलद्वारे शासनास तात्काळ सादर करावा, ही विनंती.

आपला,

(प्रविण घोरपडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत:- वरील प्रमाणे

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

आयुक्त, सर्व महानगरपालिका,
उपरोक्त विधानसभा आश्वासनाच्या अनुषंगाने आपला स्वयंस्पष्ट अहवाल तात्काळ आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यात यावा, ही विनंती.

(71)


G20

**कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर**

(सामान्य प्रशासन विभाग)

महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४०००१

**Email Id – gadnmcnagpur@gmail.com**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पत्र क्र. :- साप्रवि/विपआ-२०२३/ १६ /२०२३ दिनांक:- २६/०९/२०२३

**विधानमंडळ कामकाज/ कालमर्यादा /अति-तातडीचे**

प्रति,

मा.वैद्यकिय अधिकारी
आरोग्य विभाग,
महानगरपालिका नागपूर.

**कालमर्यादा**

विषय :- **महाराष्ट्र विधानपरिषदेतील आक्ष्वासन क्रमांक.३१७.**
मा. विधानपरिषद सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील विधानपरिषदेतील आक्ष्वासन क्रमांक.३१७, “ महानगरपालिकेने शहरातील विशेष मुलांना आजारात दर्जात्मक सेवा मिळावी म्हणुन खाजगी आरोग्य सेवे प्रमाणे परवडणाऱ्या दरात सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरु करण्याबाबत’’.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी (नवि-२०), नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे पत्र क्र. विपआ-२०२३/प्र.क्र.२६०/नवि-२०, दिनांक:-१८/०९/२०२३.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभा **महाराष्ट्र विधानपरिषदेतील (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील आक्ष्वासन क्रमांक.३१७.** “महानगरपालिकेने शहरातील विशेष मुलांना आजारात दर्जात्मक सेवा मिळावी म्हणुन खाजगी आरोग्य सेवे प्रमाणे परवडणाऱ्या दरात सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरु करण्याबाबत’’. **मा. विधानपरिषद सदस्य श्री. सचिन अहिर** यांनी दिनांक १८/०९/२०२३ रोजी उपस्थित केलेला असुन सदर विषय हा आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे पाठविण्यात येत आहे. स्वयंस्पष्ट अहवाल, पुरक टिप्पणीसह ud२६.urban-mh@mah.gov.in शासनाच्या संकेतस्थळावर त्वरीत पाठविण्यात यावी, तसेच पाठवण्यात येणाऱ्या उत्तराची एक प्रत gadnmcnagpur@gmail.com या ईमेलवर प्रत सुलभ माहितीसाठी या कार्यालयास पाठविण्याची विनंती आहे.

सहपत्र :- संदर्भिय पत्र

सहा. अधिक्षक
सामान्य प्रशासन विभाग
महानगरपालिका नागपूर

27/9/23

प्रतिलीपी :-

१) मा. उपायुक्त, साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.
२) मा. सहा. आयुक्त साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.

# नागपूर महानगर पालिका, नागपूर

## (आरोग्य विभाग)

क्रमांक - आ वि 3323/मा अ (एम)/2023
दिनांक - २१.११.२०२३

वैद्यकीय आरोग्य अधिकारी(एम) यांचे कार्यालय
२ रा माळा महानगरपालिका मार्ग सिव्हील लाईन्स नागपूर-०१
Email - hohnmc.ngp@gmail.com.

प्रति,

सहा.अधिक्षक,
सामान्य प्रशासन विभाग,
म.न.पा., नागपूर

विषय :- महाराष्ट्र विधानपरीषदेतील आश्वासन क्रमांक ३१७.

संदर्भ :- आपले पत्र क्र.साप्रवि/विपआ-२०२३/१६/२०२३ दि.२६.०१.२०२३

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने नागपूर महानगरपालिका क्षेत्रात शासनाद्वारे सुरु करण्यासाठी प्रस्तावित असलेले अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरु करण्यास्तव शासनस्तरावरुन आरोग्य सेवे संबंधी निकषाबाबत अद्याप कुठलेही सूचना प्राप्त नसल्याने यासंबंधी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

शासनस्तरावरुन होणाऱ्या धोरणात्मक निर्णयाचे अधिन सूचना प्राप्त झाल्यावर नागपूर महानगरपालिका क्षेत्रात अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरु करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

डॉ.नरेंद्र बहिरवार
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
म.न.पा.नागपूर

प्रतिलिपी सविनय माहितीस्तव सादर :-
१. मा.अति.आयुक्त(शहर) म.न.पा., नागपूर

O/C
21/11/2023

NMC/OWL/SW/2023-24/30543

(71)



नागपूर महानगरपालिका,नागपूर
समाज विकास विभाग
क्रमांक :-585/ सकवि
दिनांक :- 23/11/2023

प्रति,

सहा.आयुक्त (साप्रवि),
महानगरपालिका,नागपूर

विषय :- महाराष्ट्र शासनाचे तारांकित/अतारांकित/आश्वासन संबंधी माहिती बाबत

संदर्भ :- आपले व्हाट्सएप्प द्वारे प्राप्त तारांकित/अतारांकित/आश्वासन बाबतचे एकत्रित अहवाल अन्वये

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने व्हाट्सएप्प द्वारे प्राप्त तारांकित/अतारांकित/आश्वासन बाबतचे एकत्रित अहवालातील अनु क्र.2 वरील महाराष्ट्र विधानपरिषद आश्वासन क्रमांक 317 संबंधित माहिती वैद्यकीय आरोग्य अधिकारी,आरोग्य विभाग यांचेशी निगडीत आहे.यासंदर्भात वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी पत्रव्यवहार केल्याची प्रत सोबत संलग्न करण्यात येत आहे.

तसेच अनु.क्र.6 वरील विधानसभा तारांकित प्रश्न क्र.72750 संबंधित माहिती विभागामार्फत विभागाचे पत्र क्र.583/सविवि,दि.21.11.2023 अन्वये शासनास पाठविण्यात आली असून प्रत सोबत संलग्न करण्यात येत आहे.

सोबत संलग्न- वरीलप्रमाणे

समाज विकास अधिकारी
महानगरपालिका ,नागपूर

**प्रतिलिपी -**

1. मा.उपायुक्त (सविवि), महानगरपालिका,नागपूर यांना माहितीस्तव सादर

True copy.
23/11/23
केंद्रीय आवक/जावक
महानगरपालिका, नागपूर.